MHWS110000072026

# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४/२०२६

## सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कारंजा (लाड) यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी पी. डी. देवरे)

१. **गयासोद्दीन शमशोद्दीन**
वय ७९ वर्ष, व्यवसाय – निरंक

२. **करीमा बी गयासोद्दीन**
वय ७५ वर्ष, व्यवसाय – गृहिणी

३. **नसीमा परविन नजमोद्दीन**
वय ५२ वर्ष, व्यवसाय – गृहिणी

४. **महेर अर्शीया अब्दुल आरिफ**
वय २७ वर्ष, व्यवसाय – गृहिणी

५. **आवेजोद्दीन नजमोद्दीन**
वय २३ वर्ष, व्यवसाय – शिक्षण
सर्व राहणार– बिबीसाहब पुरा, कारंजा (लाड)
ता. कारंजा, जिल्हा वाशिम. **.... अर्जदार**

**– विरूध्द –**

**निरंक** **.... सामनेवाला**

दावा– **बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज.**

.......................................................................................................

अर्जदारांतर्फे वकील **श्री. के. एम. खान**

सामनेवालातर्फे वकील – **कोणी नाही**

.......................................................................................................

## <u>निशाणी क्र.०१ वरील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज मयत **नजमोद्दीन गयासोद्दीन** यांचा वारस दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. **<u>अर्जदार यांचे कथन खालीलप्रमाणे –</u>**

मयत नजमोद्दीन गयासोद्दीन हे अर्जदार क्र. १ व २ यांचा मुलगा, अर्जदार क्र.३ चे पती व अर्जदार क्र. ०४ व ०५ यांचे वडील आहे. मयत नजमोद्दीन गयासोद्दीन यांचा मृत्यु दिनांक २५/०८/२०२५ रोजी रस्ता अपघातात कारंजा ते अमरावती रोडवर कामरगांवजवळ झाला. अर्जदार हे बिबीसाहबपुरा, कारंजा (लाड), ता. कारंजा, जि. वाशिम येथील रहिवासी आहे. करिता मयत नजमोद्दीन गयासोद्दीन यांना अर्जदारांव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारांना ते मयत नजमोद्दीन यांचे वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारस दाखला आवश्यक आहे. सबब, अर्जदारांनी ते मयत नजमोद्दीन यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

४. निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारीत करुन दिनांक ०१.०२.२०२६ रोजीच्या 'दैनिक पुण्यनगरी' निशाणी क्र.१७ या वर्तमानपत्रातुन जाहीर प्रगटन देवून तसेच जाहीरनाम्याद्वारे हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु अद्यापपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

५. अर्जदारांच्या कथनांवरून माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | **होय** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ बाबत –</u>**

६. सदर अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार क्र.०५ आवेजोद्दीन यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक ०९ वर दाखल केले आहे. मयत नजमोद्दीन गयासोद्दीन यांच्या मृत्यु दाखल्याच्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र. १० वर, मयत नजमोद्दीन व अर्जदारांच्या मुळ आधारकार्डवरुन पडताळणी केलेल्या आधारकार्डच्या प्रती अनुक्रमे निशाणी क्र. ११ ते १६ वर व 'दैनिक पुण्यनगरी' या वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र.१७ वर असे दस्तऐवज दाखल केलेले आहेत.

७. जाहीर नोटीस दिल्यानंतरही प्रस्तुत अर्जामध्ये कोणीही हजर झाले नाही, अगर आपली हरकत नोंदविलेली नाही. अर्जदार यांच्या वतीने त्यांच्या मा. विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत नजमोद्दीन गयासोद्दीन यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

८. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार हे मयत नजमोद्दीन गयासोद्दीने यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांनी दिलेला पुरावा हा विनाआव्हानीत राहीला व सदर पुराव्यावर अविश्वास दर्शवावा असे कोणतेही कारण दिसून येत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत **नजमोद्दीन गयासोद्दीन** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला देण्यात यावा.

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.06.15 17:53:00 +0530

दिनांकः १५/०६/२०२६.

**(पी. डी. देवरे)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
कारंजा (लाड).

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | **Shivam B. Patange (LG)** |
| Court Name | :- | Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Karanja. |
| Date of Order | :- | 15.06.2026. |
| Order signed by P.O. | :- | 15.06.2026. |
| Order uploaded on | :- | 15.06.2026. |